



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १६२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२४ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



# नागपूर हादरलं !

## दोघांमध्ये वाद अन् बॉयफ्रेंडने रुचिताला संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर रोडवरील फेटरी गाव परिसरात असलेल्या एका ओयो हॉटेलमध्ये प्रेमसंबंधातून घडलेल्या निर्घृण हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. प्रियकरानेच आपल्या प्रेयसीच्या गळ्यावर चाकूने वार करून तिची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मृत तरुणीचे नाव रुचिता राजेंद्र भांगे (वय २१) असे असून, तिचा मूळ मुक्काम आष्टी खुर्द, कळमेश्वर येथे आहे. सध्या ती गिट्टीखदान परिसरात वास्तव्यास होती. आरोपी प्रियकराचे नाव सौरभ जामगडे (वय २४, रा. आष्टी खुर्द) असे आहे.

प्राथमिक माहितीनुसार, गुरवारी दोघेही संबंधित ओयो हॉटेलमध्ये दाखल झाले. खोलीत गेल्यानंतर




काही वेळातच त्यांच्यात वाद सुरू झाला. हा वाद इतका टोकाला गेला की संतप्त झालेल्या सौरभने जवळील चाकूने रुचिताच्या गळ्यावर जोरदार वार केला. या हल्ल्यात रुचिता गंभीर जखमी झाली. हॉटेल कर्मचाऱ्यांना काही समजण्याच्या आतच तिचा प्रचंड रक्तस्राव झाला आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाला. आरोपी प्रियकराने पुरावे नष्ट करण्याचा आणि पोलिसांच्या हाती न लागण्याचा प्रयत्न करत हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारून पळ काढल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच हॉटेल प्रशासनाने तत्काळ कळमेश्वर पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी हॉटेलमधील खोलीची पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, आरोपीच्या हालचालींचा माग काढण्याचे काम सुरू आहे. तसेच, मृत तरुणी आणि आरोपी यांच्यातील प्रेमसंबंध, वादाचे नेमके कारण आणि घटनेमागील पार्श्वभूमीचा सखोल तपास केला जात आहे. दरम्यान, प्रेमप्रकरणातून वाढत चाललेल्या हिंसक घटनांमुळे नागपूर शहरातील कायदा - सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## दावोसमध्ये महाराष्ट्राचे 30 लाख कोटींचे सामंजस्य करार - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, मुंबई :** दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांपैकी ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे. या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्या वर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ही गुंतवणूक ३ ते ७ वर्षांत परावर्तित होत असते, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसबीजी, ब्रुकफिल्ड, आर्सेलर मित्तल, फिनमन ग्लोबल, इस्सार, स्कोडा ऑटो, फॉक्सवेगन, एसटीटी टेलिमीडिया, टाटा, अदानी, रिलायन्स, जेबीएल, कोकाकोला, बॉश, कॅपिटल लँड, आयर्न माऊंटेन अशा अनेक कंपन्यांशी हे करार झालेले आहेत. काही समूह हे भारतीय असले तरी त्यांची सुमारे १६५ देशांमध्ये




- १० लाख कोटींच्या कराराची प्राथमिक बोलणी पूर्ण
- ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक
- एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात गुंतवणूक
- ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट
- देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईनजीक
- मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी विकसित करणार

गुंतवणूक आहे. क्वांटम काम्प्युटिंग, एआय, जीसीसी, डेटा सेंटर्स, आरोग्य, अन्न प्रक्रिया, ग्रीन स्टील, नगरविकास, जहाजनिर्माण, फिनटेक, लॉजिस्टीक, डिजिटल इन्फ्रा अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आली आहे.

**सर्वदूर गुंतवणूक !**

कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, तर ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टँडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

देशातील पहिली इनोव्हेशन सिटी

टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत, येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याच वर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमीचा विकास!**

मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करणार असून मुंबईतील पाणी, हवा याचे प्रश्न यातून सोडविण्यात येतील. सर्व प्रकारच्या वेस्टवर प्रक्रिया झाली पाहिजे, हा प्रयत्न यातून करण्यात येणार आहे. पुढे हीच संकल्पना सर्व मोठ्या शहरांमध्ये नेण्यात येईल. मुंबईत पुढच्या २ ते ३ वर्षात हा परिणाम आपण दाखवू शकू. रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा याच दावोसमध्ये करण्यात आली. या ग्रोथ सेंटरमुळे एक बिझनेस डिस्ट्रीक्ट तयार होईल. यात १ लाख कोटींची गुंतवणूक कालच आली आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**अन्य भेटीगाठी...**

झिम्बांब्वे परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री प्रो. ॲमोन मुरविरा यांनी महाराष्ट्राच्या सौरऊर्जा क्षेत्रातील प्रगतीची एका परिषदेत मुक्तकंठाने प्रशंसा केली. या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते.

ॲलन टुरिंग इन्स्टियूट मिशन संचालक ॲडम सोबे यांची देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेत त्यांच्याशी वाहतूक क्षेत्राबाबत चर्चा केली. कार्बन उत्सर्जन कमी करुन स्वच्छ आणि भविष्याच्या गरजा भागवता येतील, अशा उपाययोजनांबाबत ही चर्चा झाली.

अरुप समूहाच्या अध्यक्ष हिल्डे टोन यांच्याशी नगरविकासाच्या विविध पैलूंवर, इंडो-इटालियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे ॲलेसेन्ड्रो ग्युईलानी यांच्यासोबत परस्पर सहकार्य वाढवण्यावर यावेळी चर्चा झाली.

## टाकळी ढोकेश्वर परिसरात, आंब्याची झाडे मोहराने बहरली

### आंबा उत्पादकांच्या आशा पल्लवित !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** डिसेंबर आणि जानेवारी महिन्यातील पोषक वातावरणामुळे पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरातील ग्रामीण भागात गावरान आंब्याची झाडे यंदा मोहराने रसरसून गेली आहेत. सर्वत्र आम्रमोहर बहरल्याने आंबा उत्पादकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या ढगाळ हवामानामुळे या मोहरावर संक्रात येण्याची भीती व्यक्त केली जात असून, शेतकरी वर्गात काहीसा चिंतेचा सूर उमटत आहे.

यावर्षी पावसाने चांगली साथ दिल्याने नदी, नाले आणि तलाव पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. जमिनीतील ओलावा टिकून असल्याने रब्बी हंगामातील हरभरा, ज्वारी आणि गव्हाची पिके जोमात आहेत. याच अनुकूल परिस्थितीमुळे यावर्षी तिखोल, ढोकी, काकनेवाडी, कासारे, सावरगाव, वनकुटे, ढवळपुरी, वासुंदे टाकळी ढोकेश्वर परिसरातील अतिशय जुनाट गावरान आंब्यांच्या झाडांना विक्रमी मोहराने बहरले आहे. त्याचा फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. गावरान आंब्याचा तोच खास गोडवा यंदाही चाखायला मिळेल, या आनंदात शेतकरी होते.

मागील महिन्याभरापासून वातावरण अतिशय पोषक होते, मात्र १२ जानेवारीच्या दुपारपासून अचानक वातावरणात बदल झाला. ढगाळ हवामान तयार झाल्याने आलेला मोहर गळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जर हे वातावरण असेच राहिले, तर मोहरावर कीड लागून उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

● अहिल्यानगर जिल्ह्यात साधारण तीस हजार हेक्टरपेक्षा अधिक आंब्याचे क्षेत्र आहे. अलीकडच्या काळात शेतकरी आंबा लागवडीला प्राधान्य देत आहेत. कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून फळबाग लागवडीसाठी अनुदान घेणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांनी गेल्या पाच वर्षांचा विचार केला तर आंबा लागवडीला प्राधान्य दिले आहे. गुणवत्तापूर्ण हापूस, उत्पादनासाठी काटेकोर व्यवस्थापनावर भर त्यामुळे आंब्याचे क्षेत्र वाढत असून त्यातही केसर आंब्याची अधिक लागवड झाली आहे.

चार ते पाच वर्षांपूर्वी लागवड केलेल्या झाडांना आता मोहर आला आहे. आंबा पिकाचे उत्तम उत्पादन मिळवण्यासाठी सध्याच्या परिस्थितीत मोहराचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ढगाळ हवामान आणि पावसाची शक्यता लक्षात घेता, शेतकऱ्यांनी तातडीने तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी, जेणेकरून मोहर गळती थांबवता येईल असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, ठाणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे येथे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. या अनुषंगाने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दि.२३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हा परिषद इमारतीच्या आवारात शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हा परिषद कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व अधोरेखित करताना, लोकशाही व्यवस्थेवर दृढ विश्वास ठेवणे, संविधानिक मूल्यांचे पालन करणे, मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे तसेच मतदानाचा हक्क बजावणे, या बाबींविषयी उपस्थितांना शपथ देण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी अंजली अंबेकर, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय किर्ती डोईजोडे, लेखाधिकारी रविंद्र सकपाळ, सहाय्यक प्रशासन अधिकारी श्रीकांत खंडागळे, कनिष्ठ सहाय्यक लेखाधिकारी मनोज देवकर, ग्रामपंचायत अधिकारी हिरामण खाडे तसेच जिल्हा परिषद ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन, नवमतदारांमध्ये जागृती निर्माण करणे तसेच नागरिकांमध्ये मतदानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन वाढविणे, हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# तारीख, तारीख आणि तारीख




२१ जुन २०२२ रोजी महाराष्ट्रात शिवसेनेच्या आमदारांनी पक्ष सोडण्याची घटना घडली आणि राज्यात सत्तांतर झाले तेंव्हा पासून आमदारांच्या अपात्रतेसारखे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे प्रकरण देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेकडे न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. पक्षांतर बंदी कायदा, शेड्युल दहा या सगळ्यांना बगल देत आणि तत्कालीन राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष यांच्या मदतीने जे सरकार बनवले गेले आणि २०२४ मधे खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच घटनाबाह्य ठरवलेल्या सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला, त्या विधानसभेने आपला कार्यकाळ देखील पुर्ण केला. लोकसभा विधानसभा आता राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील पार पडत आहे मात्र आमदारांची अपात्रता आणि शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पक्ष आणि चिन्हा बाबत अंतिम निकाल तर दुरच साधी सुनावणी देखील होत नाही. दरवेळेस तारीख दिली जाते आणि त्या तारखेला पुढची तारीख दिली जाते यापलिकडे काही होत नाही.२०२३ मध्ये हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले तेव्हा एन.व्ही रमण्णा हे सरन्यायाधीश होते त्यानंतर यु. यु. ललित, डी. वाय चंद्रचूड, संजीव खन्ना, भुषण गवई हे पाच सरन्यायाधीश आले आणि गेले आता जस्टीस सुर्यकांत हे सहावे सरन्यायाधीश आहेत. गेल्या वर्षी १२ नोव्हेंबर ची तारीख निश्चित करतांना आता या प्रकरणी अंतिम सुनावणी होणार असे सर्वोच्च न्यायालयानेच स्पष्ट केले होते त्या अगोदर ऑगस्ट मधे हे प्रकरण आम्हाला लवकरात लवकर निकाली काढायचे आहे असे स्पष्ट केले होते. मात्र मध्येच कलम ३७० बाबत घटना पिठासमोर सुनावणी घ्यावी लागली म्हणून या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. ही सुनावणी ज्या जे. सुर्यकांत आणि बागची या दोन न्यायाधिशांसमोर होत आहे. त्यांनीच आता हे प्रकरण पुढील वर्षी एकवीस जानेवारी रोजी सुनावणीला येईल हे सांगत जर सुनावणी पूर्ण झाली नाही तर बावीस तारीख राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. २१ जानेवारी ही तारीख ठरवतांना युक्तीवादास कोणाला किती वेळ लागेल याची देखील चर्चा झाली आणि सहा तास युक्तिवादासाठी ठरले होते. २१ तारखेला सकाळी साडे अकरा वाजता सुनावणी ची वेळ ठरली मात्र हे प्रकरण सदतीसाव्या क्रमांका वर ठेवले गेले त्यामुळे सुनावणी होईल की नाही याबाबत शंकांच होती आणि झाले ही तसेच. शिवसेनेच्या वकिलांनी तातडीच्या सुनावणीची मागणी केली मात्र सर्वोच्च न्यायालयाने या सुनावणीसाठी प्रलंबित प्रकरणे एका महिन्यात सुनावणीसाठी घेऊ असे सांगत चार आठवड्यानंतर सुनावणी घेऊ असे सांगितले. आता चार आठवड्यानंतर कुठची तारीख मिळणार त्या तारखेला देखील सुनावणी होईल याची खात्री नाही जरी सुनावणी झाली तर निकाल लगेच लागणार असे ही नाही कदाचित निकाल राखून ठेवला जाईल आणि


अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
मोबा. ९१५८४९५०३७

निकाल राखून ठेवला तर तो कधी दिला जाईल हे कोणालाच सांगता येणार नाही. न्यायालयासमोर येणारी सर्व प्रकरणे महत्त्वाचीच असतात मात्र हे प्रकरण बाजुला ठेवुन एस आय आर, अरवली पर्वत, तसेच दिल्ली प्रदुषणासारखी आताची प्रकरणे सुनावणीसाठी घेतली जातात.

तेरा कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात घटनाबाह्य घटना घडुनही आणि त्यावर देशाचे राजकारण, सत्ताकारण, तसेच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे अशा महत्त्वाच्या प्रकरणात देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेत केवळ तारीख पे तारीख चा खेळ चालला आहे. त्यानंतरची प्रकरणे सुनावणी साठी घेतली जातात मात्र या प्रकरणाबाबच तारीख पे तारीख चा खेळ खेळला जात आहे हे अनाकलनीय आहे. सर न्यायाधीश सुर्यकांत यांचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२७ पर्यंत आहे. या प्रकरणी चाललेला तारीख पे तारीख चा खेळ पहाता त्यांच्या कार्यकाळात तरी या प्रकरणाचा निकाल लागेल का या बाबत साशंकताच आहे. न्यायाला ऊशिर म्हणजे न्याय नाकारण्यासारखे आहे. याबाबत देखील तसेच काही झाले आहे. आता आमदार अपात्र ठरले काय किंवा नाही ठरले काय त्याला कागदी महत्त्वा पलीकडे काय अर्थ रहाणार?. पक्ष चिन्हाबाबत लोकसभा, विधानसभा निवडणुका होऊन गेल्या आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊन जातील तरी देखील निकाल लागु नये याचा नेमका अर्थ कसा काढायचा?. पक्ष फोडुन, आमदार, खासदार फोडुन, पक्षांतर बंदी कायदा खुंटीला टांगुन ऐन केन प्रकाराने सरकारे बनवली जाऊ शकतात आणि ती कोणतीही आडकाठी न येता चालु देखील शकतात हे मात्र या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

सध्या महानगरपालिकांच्या निकालानंतर म तदारांच्या मतांचा विश्वासघात करुन ज्या पद्धतीने सत्ताकारण चालले आहे ती याचीच परिणती आहे. ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती ना कोणाला अपाात्रतेच भिती. या सगळ्यांत लोकशाहीच्या आत्मा असलेल्या निवडणूकांना अर्थ तरी काय ऊरणार? अशामुळेच लोकशाहीचे दररोज धिंडवडे निघत आहेत. न्यायव्यवस्थेवर न्यायदानाबरोबरच, घटनेच्या रक्षणाची जबाबदारी, तसेच जनतेच्या मुलभूत अधिकारांचे रक्षण करण्याची देखील जबाबदारी आहे हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे.

## 'केक'चा वाढता प्रभाव !



आपल्या आनंदात इतरांनाही सामावून घेण्यासाठी मिठाई वाटून इतरांचेही तोंड गोड करण्याची पद्धत अगदी पुराणकाळापासून चालत आलेली आहे. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी प्रजेला हत्तीवरून मिठाई वाटत असत. मिठाईचे सतराशे शहाण्णव प्रकार आपल्याकडे उपलब्ध आहेत. देवी-देवतांच्या उत्सवांना नैवेद्य म्हणून ५६ भोग देण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. उत्तर भारतात ही परंपरा आजही उत्साहाने जपली जाते. आनंदाचे क्षण हे साजरे करण्यासाठीच असतात. इतरांचे तोंड गोड करून आपला आनंद साजरा केल्याने त्यामध्ये इतरही सहभागी होतात ज्यामुळे वातावरणात आनंद लहरी पसरून वातावरणही आनंददायी होते. त्यामुळे आनंद साजरा करण्याची प्रथा जगभरात सर्वच प्रांतांत दिसून येते.

आजमितीला बहुतांश पालक आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालतात. आपले मूल कमावते झाल्यावर स्पर्धात्मक जगात ते मागे राहू नये. इंग्रजीवर त्याचे प्रभुत्व असावे यासाठी हा सारा खटाटोप असतो. केवळ इंग्रजीवर प्रभुत्व राहावे या उद्देशाने मुलांना कॉन्व्हेंट शाळांत घालणारे पालक संपूर्ण शालेय जीवनात पाल्यांवर कोणत्या संस्कृतीचे संस्कार होणार आहेत याबाबत मात्र अनभिज्ञच असतात. बहुतांश कॉन्व्हेंट शाळा या ख्रिस्ती संस्थांमार्फत चालवण्यात येत असल्याने या शाळांमधून ख्रिस्ती पंथांचे संस्कारच अधिक केले जातात. या शाळांमध्ये मुलांना कपाळाला तिलक लावण्यास, गळ्यात देवतांचे चित्र घालण्यास मज्जाव केला जातो, मुलींनी कपाळाला बिंदी लावणे, हातांना मेहेंदी लावणे, बांगड्या घालणे यांवर बंदी घातली जाते, मुलींना गुडघ्याच्या वर स्कर्ट घालण्याची सक्ती केली जाते, हिंदू सणांच्या वेळी सुट्टी न देता मुद्दामहून परीक्षा ठेवल्या जातात, गणपती-दिवाळी सणांपेक्षा येथे ख्रिसमस अधिक उत्साहात साजरा केला जातो, आनंदाचे क्षण केक कापून आणि वाटून साजरे केले जातात. पाल्याच्या शिक्षणासाठी कॉन्व्हेंट शाळेची निवड पालकांनीच केलेली असल्याने तेही हे सारे निमूट सहन करतात, मुलांचे मन संस्कारक्षम असल्याने शालेय जीवनात होणारे संस्कारच त्यांच्या अंर्मनात दृढ होतात परिणामी हिंदूंचे सण, प्रथा परंपरा या मुलांना बुरसटलेल्या वाटू लागतात. संस्कृतीप्रेमी संघटनांनी अशा कॉन्व्हेंट शाळांना वेळोवेळी दिलेल्या समजमुळे काही प्रमाणात फरक पडला असला तरी बहुतांश ठिकाणी हीच परिस्थिती दिसून येते

सध्याचे बॉलिवुड चित्रपट आणि ओटीटी प्लेटफॉर्म्सवर दिवसागणिक येणाऱ्या वेब सिरीज या सर्वांमध्येही पाश्च्यात्य विकृतीला खतपाणी देणारी दृश्ये सादर केली जातात. यातील नट्या तोकड्या कपड्यांत, मद्यपान करताना वावरताना दिसतात, यातील नट बऱ्याचदा नास्तिक विचारसरणीचा दाखवण्यात येतो. इथे आनंदाचा क्षण मग तो नोकरी लागल्याचा असो किंवा नोकरीत पदोन्नती मिळण्याचा असो, साखरपुडा असो व लग्न असो सर्वच ठिकाणी हे क्षण मद्यपान करून आणि केक कापून साजरे केले जातात. चित्रपट आणि वेब सिरीजचा वाढता प्रभाव आणि शालेय जीवनात होणारे पाश्चात्य संस्कृतीचे संस्कार यांचे पडसाद आता दैनंदिन जीवनावरही पडू लागले आहेत. आजचा तरुण आपले आनंदाचे क्षण मिठाई वाटून नव्हे, तर केक कापून साजरा करू लागला आहे. आनंदाचा क्षण मग तो कोणताही असो. घरात नवीन पाहुणा येण्याची चाहूल असो वा पाहुण्याचे अर्थात बाळाचे बारसे असो सेलिब्रेशन केक कापून केले जाते, नोकरी लागणे, कर्ज मान्य होणे, नोकरीत पदोन्नती मिळणे, नोकरीत मनासारखी बदली मिळणे, नवीन घर घेणे, नवीन गाडी घेणे, स्पर्धा जिंकणे, लग्न ठरवण्याचा कार्यक्रम, साखरपुडा, लग्न सर्वच आनंदाच्या क्षणी केक आणून ते कापणे आता अनिवार्य होऊ लागले आहे. काही वर्षांपूर्वी केवळ वर्षातून एकदा वाढदिवसाला दिसणारा केक आता आनंदाच्या प्रत्येक क्षणी दिसू लागला आहे. ज्यामुळे आता नाक्यानाक्यावर केकची नवनवीन दुकाने उघडली जाऊ लागली आहेत. आनंदाचे क्षण हे गोडधोड वाटून साजरे करण्याची आपल्या संस्कृतीतील संकल्पनाच आता कालबाह्य होऊ लागली आहे. मुळात केक कापणे ही आपली संस्कृती नव्हे. भारतीय हिंदू संस्कृतीनुसार शिजवलेल्या अन्नावर शस्त्र फिरवणे अशुभ मानले जाते आणि आनंदाच्या क्षणीच आपण नकळतपणे अशुभ कार्य करतो. आहारशास्त्रानुसार उत्तम आरोग्यासाठी नेहमी ताजे अन्न खावे. आनंदाच्या क्षणी तर शिळे अन्न मुळीच खाऊ नये. आनंद साजरा करण्यासाठी आणलेला केक खास ऑर्डर देऊन मागवला असला तर त्यासाठी वापरण्यात आलेला ब्रेड आणि क्रीम ताजी असते का ? आनंदाच्या क्षणी आपण केवळ पाश्चात्य संस्कृतीलाच जवळ करत नाही, तर आपल्या भारतीय संस्कृतीला जिने सदैव मानवाच्या सर्वांगीण विकासाचाच विचार केला आहे तशा प्रथा परंपरा दैनंदिन जीवनात रुजवल्या आहेत तिचाही अनादर करत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

**- जगन घाणेकर**

# तंबाखूमुक्तीची शपथ !



स्वतंत्र भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन यंदा साजरा होत आहे. हा दिवस स्वतंत्र भारताच्या संविधानाचा सन्मानाचा दिवस आहे. या दिवशी भारताच्या स्वातंत्र्यलढयाचे स्मरण व चालना देणारे कार्यक्रम देशभरात आयोजित केले जातात.

मात्र देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके लोटली तरी आपण अनेक अनिष्ट, अनुचित रूढी, परंपरा, सवयीच्या जोखडात बंदिस्त आहोत. व्यसन हे कुठलेही वाईटच. मात्र अनेक व्यसने ही प्राणघातक ठरु शकतात. त्यातीलच एक घातक व्यसन म्हणजे तंबाखू सेवन. आज आपल्याभोवती वावरणाऱ्या बहुतांशी लोकांना तंबाखूचे व्यसन असल्याचे दिसून येते. गुटखा, खर्रा, जर्दा, विडी, सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या विळख्यात आपला समाज आज सापडलेला आहे. आज आपण कार्यालये, सार्वजनिक स्थळे, बस, रेल्वे परिसर, सिनेम ागृहे, सार्वजनिक प्रसाधनगृहे ही सर्वच ठिकाणे बारकाईने पाहीली तर त्या ठिकाणी हे व्यसनी लोक हे परिसर अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त करताना दिसतात. सरकारने तंबाखूबंदीचे कडक कायदे आणूनदेखील लोक त्याला जुमानेसे झाले आहेत.

तंबाखूविरोधी कायदा आज राज्यात अस्तित्वात आहे. तंबाखूच्या य पदार्थांची विक्री खुलेआम आज टपऱ्यांवर, बाजारात, रेल्वे म ध्ये, कार्यालयांमध्ये होताना दिसते. तंबाखूच्या दुष्परिणामांची माहीती असतानादेखील त्याचे सेवन म्हणजे आत्मघातकीपणाच म्हणावा लागेल. मात्र व्यसनी लोक त्याच्या इतके आहारी गेले आहेत की त्यांचे व्यसन सोडवणे म्हणजे एक दिव्यच आहे अशी परिस्थिती आहे. त्यामुळे देशाच्या प्रजासत्ताक दिनी तंबाखूमुक्तीची शपथ सर्वत्र देणे आवश्यक आहे. तंबाखूमुक्तीचा नारा आजच देऊन राज्य व देश तंबाखूमुक्त करणे काळाची गरज आहे.

आज बहुतांशी सर्वच शाळा, म हाविद्यालये, सरकारी कार्यालये, चौक, पदपथ, राजकीय कार्यालये, गृहनिर्माण संस्थांच्या ठिकाणी स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. त्यावेळीच उपस्थित नागरिकांना, शालेय- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ देणे गरजेचे आहे. तंबाखूचे दुष्परिणाम व त्यापासुन होणा-या कर्करोगासारख्या गंभीर आजारांची माहिती त्यांना करुन देण्यात यावी जेणेकरुन तंबाखूजन्य पदार्थांपासुन ते परावृत्त होतील व इतरांना देखील दुर ठेवण्याचा प्रयत्न करतील. तंबाखूम ुक्त महाराष्ट्रासाठी ठोस प्रयत्न होणे गरजेचे असुन प्रजासत्ताक दिनापासुन त्याची सुरुवात करायला काय हरकत आहे.

**- वैभव मोहन पाटील**
**घणसोली, नवी मुंबई**

# टांगा पलटी, घोडे फरार!

टांगा पलटी, घोडे फरार या म्हणीचाही वापर अनेकदा राजकारणात, निवडणुकीत किंवा कोणत्याही स्पर्धेत अचानक निकाल पालटल्यावर केला जातो. ज्या व्यवस्थेवर किंवा साधनावर अवलंबून होता, तीच कोसळणे आणि आपले आधारच निसटून जाणे ,असा या म्हणीचा अर्थ होतो. सर्रास एखाद्याच्या पराजयानंतर किंवा फटफजिती झाल्यानंतर ही म्हण वापरली जाते.

ही म्हण खरंच गमतीशीर आहे. टांगा पलटी झाल्यामुळे घोडा फरार झाला, की घोडा फरार झाल्यामुळे टांगा पलटी झाला ˝ हे मात्र प्रत्येक घटनेनंतर चर्चेचा आणि संशोधनाचा विषय ठरतो. थोडक्यात, एखाद्याची दैना उडाल्यानंतर टांगा पलटी, घोडे फरार ही म्हण वापरली जाते. या म्हणीला साजेशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडताना दिसतात.

एखादा विद्यार्थी वर्षभर केवळ मजा-मस्ती करत राहतो. वर्गात शिकण्याकडे लक्ष देत नाही, अभ्यासाला गांभीर्याने घेत नाही, शिक्षकांशी उद्धटपणे वागतो आणि मित्रांसोबत उनाडक्या करत राहतो. पालकांसमोर अभ्यास करण्याचा खोटा देखावा करतो आणि त्यांना अंधारात ठेवतो. शेवटी बोर्डाची परीक्षा होते. निकाल लागतो आणि सहापैकी पाच विषयाच्या दांड्या उडालेल्या असतात. तेव्हा त्याच्यावर बारकाईने लक्ष ठेवणारे लोक त्याला उद्देशून म्हणतात ˝ टांगा पलटी, घोडे फरार!

एखादा दारुडा एखाद्या दिवशी स्वतःवरील नियंत्रण हरवतो. तो एकामागोमाग एक पॅक रिकामे करत राहतो. नंतर घराकडे जायला निघतो, तेव्हा त्याला वाटते की आपले घर जणू पृथ्वीच्या दुसऱ्या टोकावर आहे. पाय उचलण्याइतकी ताकद राहत नाही. तो कसेबसे थोडे अंतर पार करतो आणि शेवटी रस्त्याच्या कडेला कोसळतो. हे दृश्य पाहणारे ओळखीचे आणि अनोळखी लोक म्हणतात ˝ टांगा पलटी, घोडे फरार!

एखादी व्यक्ती नवीन उद्योग सुरू करते; पण त्या परिसरातील लोकांच्या गरजा न ओळखता चुकीचा व्यवसाय निवडते. उदाहरणार्थ, ज्या गावात चारचाकी गाड्यांची संख्या कमी आहे, तिथे चारचाकी गाड्यांचे गॅरेज सुरू केल्यास तो व्यवसाय चालणार नाही. काही दिवसांतच तो बंद पडतो. तेव्हा लोक म्हणतात ˝ टांगा पलटी, घोडे फरार!

एखादा उमेदवार स्वतःची कुवत न तपासता, जनतेशी संपर्क न साधता आणि कोणतेही सामाजिक-राजकीय काम न करता निवडणूक लढवतो. निवडणुकीपूर्वी तो स्वतःच्या लोकप्रियतेबद्दल म ोठमोठ्या बाता मारतो. पण निकाल लागतो तेव्हा त्याचे डिपॉझिट जप्त झालेले असते. अशावेळी लोक म्हणतात ˝ टांगा पलटी, घोडे फरार!

अशा प्रकारे प्रत्येकाच्या जीवनात कधीतरी, कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात टांगा पलटी, घोडे फरार अशी परिस्थिती येतेच. एखाद्याच्या पराजयावर लोक टीका करतात, चिडवतात किंवा हिणवतात ˝ हे वास्तव आहे. मात्र निंदकाचे घर असावे शेजारी या म्हणीप्रमाणे, लोकांनी दाखवलेल्या चुका आणि पराजयाची कारणे आपण सकारात्मक दृष्टीने घेतली, तरच आपण अधिक शहाणे आणि सक्षम होऊ शकतो.

**शेवटी...**
**ज़िंदगी की यही रीत है,**
**हार के बाद ही जीत है।**
**थोड़े आँसू हैं, थोड़ी हँसी ˝**
**आज ग़म है, तो कल है ख़ुशी!**

पराजयानंतर लोकांच्या टोमण्यांनी खचून न जाता, आत्मविश्वास कायम ठेवून, पलटी झालेल्या टांग्याचा घोडा पुन्हा शोधून आणून, त्याला घट्ट टांग्यास जुंपून ; नव्या उमेदीने पुढे धावणे ˝ हाच खरा जीवनाचा विजय आहे.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## क्रेडिट

काही विभागांमध्ये
जिंकेसिंगलडिजीट
जिथे जिंकलो तिथे
घेऊ लागले क्रेडिट

प्रक्रियेवरघेई संशय
करायले हवे ऑडिट
मागणी चित्र विचित्र
इलेक्शनकरे डिलीट

आम्ही सोडून बाकी
करतात नेहमी चीट
विकले गेले आयोग
विधाने केवढी धीट

मतदारावरही क्रोध
मतदान न केलेनीट
दुःख भारी अनावर
गमवे खात्रीची सीट

तेचं तसलेचं आरोप
खरोखर आला वीट
अपेक्षितयश नमिळे
हले पायाखाली वीट

रिझल्ट्स वेडेवाकडे
कशी येवू लागे फीट
जिंकता काही जागा
मग सारे फाईन फीट

सरळसन्यास घ्यावा
हे राजकारण क्वीट
पुन्हा राहणारचं उभे
राज कारण हे स्वीट

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खासदार लंके प्रतिष्ठानच्या वतीने देहूत स्वच्छता मोहीम

## आपला मावळा संघटनेचे शेकडो कार्यकर्ते, स्वयंसेवकांचा सहभाग

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** संत तुकाराम महाराजांच्या चरणांनी पावन झालेल्या भूमीवर चरणांनी स्पर्श झालेल्या देहू नगरीत अस्वच्छता आणि पर्यावरण ऱ्हासाविरोधात थेट मैदानात उतरायची तयारी ‘आपला मावळा’ संघटनेने केली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी देहूत स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. पवित्र देहूच्या सन्मानासाठी ही मोहीम म्हणजे एक सामाजिक लढाच ठरणार आहे. या मोहिमेत देहू शहरातील प्रमुख रस्ते, घाट परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच नदीकाठाची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित न राहता, देहू परिसर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक कसा राहील, यावर भर दिला जाणार आहे. त्याचबरोबर विविध ठिकाणी वृक्षारोपण करून हिरव्या देहूचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात येणार आहे.

या स्वच्छता मोहिमेत आपला मावळा संघटनेचे शेकडो कार्यकर्ते, स्वयंसेवक, स्थानिक नागरिक तसेच युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. देहूच्या पावन भूमीसाठी ‘मावळे’ एकदिलाने मैदानात उतरणार असून, स्वच्छतेसाठी श्रमदानातून एकजूट दाखविणार आहेत.

खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार असून, यावेळी स्वच्छतेचे महत्त्व, पर्यावरण रक्षण आणि नागरिकांची जबाबदारी यावर भर देत जनजागृती करण्यात येणार आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हा संदेश या मोहिमेतून दिला जाणार आहे.




### स्वच्छ देहू - हरित देहू संकल्पना

स्वच्छ देहू - हरित देहू या ठाम संकल्पनेतून ही मोहीम राबवली जात असून, समाजातील प्रत्येक घटकाने स्वच्छता आणि वृक्षसंवर्धनासाठी पुढे यावे,असे आवाहन करण्यात येणार आहे. पवित्र देहूच्या गौरवाला साजेसा स्वच्छ व हिरवा परिसर निर्माण करण्यासाठी ही मोहीम मैलाचा दगड ठरणार आहे.

आपला मावळा संघटना आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणारी ही मोहीम सामाजिक भान, पर्यावरणाची जबाबदारी आणि सामुहिक सहभागाचे ठोस उदाहरण ठरणार असून देहूच्या पावन भूमीवर स्वच्छतेचा आणि पर्यावरण संवर्धनाचा नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

# साखरवाही फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून जिनिंग कारखान्याचा शुभारंभ

## कापूस खरेदीमुळे शेतकऱ्यांना थेट लाभ - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील साखरवाही फार्मर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या जिनिंग कारखान्याचे उद्घाटन आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. उद्घाटनानंतर तात्काळ कारखान्याच्या प्रत्यक्ष कामकाजालाही सुरुवात करण्यात आली. कापूस खरेदीमुळे शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून रोजगार निर्मिती होणार असल्याचे यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी सांगितले. या कार्यक्रमाला नामदेव डाहुले, घुग्घुस नगर परिषदेचे नगरसेवक विवेक बोढे, भाजप नेते प्रकाश देवतळे, मनोज पाल, आत्माचे प्रकल्प संचालक अरुण कुसळकर, प्रिती हिरळकर, गणेश मादेवार, तुषार चौबे, नीरज बोंडे, विजल बलकी, नरेंद्र देवतळे, विजय चिंन्नावार, निरीक्षण तांड्रा, विनोद खेवले, किशोर बावणे, प्रलय मशाखेत्री आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. या जिनिंग कारखान्यात परिसरातील शेतकऱ्यांकडून थेट कापूस खरेदी करण्यात येणार असून त्यावर प्रक्रिया करून दर्जेदार कापूस बाजारात उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापसासाठी योग्य दर मिळणार असून दलालांवरील अवलंबित्व कमी होणार आहे. उद्घाटनप्रसंगी आ. किशोर जोरगेवार यांनी सांगितले की, साखरवाही फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक, तांत्रिक आणि विपणनाच्या दृष्टीने भक्कम पाठबळ मिळणार आहे. कापूस खरेदी, जिनिंग प्रक्रिया आणि थेट विपणन यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या कारखान्यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निमाण होतील. युवकांचे सक्षमीकरण होऊन परिसराचा सर्वांगीण विकास साधला जाईल, तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास ही आ.जोरगेवार यांनी व्यक्त केला. यावेळी शेतकरी आणि स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# खापरखेड्यात राम जन्मोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह

## राम-लक्ष्मण-सीता यांच्या जिवंत झांक्यांनी वेधले भाविकांचे लक्ष



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** खापरखेडा शहरात प्रभू श्रीराम जन्मोत्सव यंदा अत्यंत उत्साह, भक्ती आणि सांस्कृतिक जल्लोषाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. प्रभाग क्रमांक ३ मध्ये ‘सीताराम महिला ग्रुप’च्या वतीने आयोजित राम जन्मोत्सव सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला. अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे औचित्य साधून या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भगवी तोरणे, आकर्षक विद्युत रोषणाई आणि फटाक्यांच्या आतषबाजीने उजळून निघाला होता. रस्तोरस्ती भगवे झेंडे, रोषणाई आणि सजावटीमुळे उपस्थित भाविकांना जणू अयोध्येतील रामनगरीत आल्याचा भास होत होता. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता माता आणि हनुमान यांच्या नयनरम्य जिवंत झांक्या. झांक्यांचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. डीजेच्या तालावर रामधून व भक्तीगीतांचा गजर सुरू असताना भगव्या साड्या परिधान केलेल्या महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मिरवणूक काढली. जय श्रीरामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. कार्यक्रमात सामूहिक आरतीचे आयोजन करण्यात आले होते. आरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या भक्तीमय सोहळ्याला बबलू ठाकुर, अमर जैन, कृष्णा यादव, श्रीराम डाखरे व डेहरिया यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चंचल गोठवाड यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या भव्य राम जन्मोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनंदा परमार, सरिता वैध, छकुली क्षीरसागर, निकिता राऊत, मनीषा वैद्य, दीक्षा डाखरे, कोमल राऊत, अश्विनी क्षीरसागर यांच्यासह ‘सीताराम महिला ग्रुप’च्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उत्सवामुळे खापरखेड्यात भक्ती, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडले.

# बारड येथे गणेश जन्मोत्सवानिमित्त भाविकांसाठी महाप्रसाद

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथील माळ्याच्या मळ्यातील गणपती ग्रामस्थांचे श्रद्धा स्थान बनले असून गणेश जन्मोत्सवानिमित्त भाविकांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला असून ’ओम गं गणपतये नमः’ च्या मंत्रात भाविकांनी मनोभावे महापूजा केली. गावालगत माळ्याच्या मळ्यात पुरातन काळातील श्री गणेश मंदिर आहे. या मंदिराचा ग्रामस्थांच्या पुढाकारातून जीर्णोद्धार करण्यात आला. दर चतुर्थीला पंच क्रोषीतील भक्तगण मोठ्या भक्तीभावे दर्शनासाठी येत असतात. या मंदिराची देखभाल कोरबनवाड परिवार यांच्याकडे आहे. निसर्गरम्य परिसरात भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. विघ्नहर्ता संस्थेच्या वतीने दर चतुर्थीला भक्तांसाठी महाप्रसाद ठेवला जातो. यानिमित्ताने भजनी मंडळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील भक्तगण सहभागी झाले होते.

# जावळी येथे माघी गणेशोत्सव जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील जावळी येथे माघी गणेशोत्सव जयंतीनिमित्त जाणीव संघटना व गुरुवर्य वामनराव अभ्यंकर स्मृती सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वरसई विभागातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शुक्रवार, दि २३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता जावळी येथे आयोजित करण्यात आलं होता. या गुणगौरव सोहळ्याला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. यावेळी आश्रम शाळा, पू न गोडसे विद्यालय, रा जी प शाळा वरसई अशा शाळेतील विद्यार्थीनी ५वी ते १२ वी पर्यत प्रथम व द्वितीय क्रमांक, क्रीडा स्पर्धेत, निबंध स्पर्धेत, कला स्पर्धेत, प्रत्येक वर्गात प्रथम, द्वितीय क्रमांक मिकवला आहे. अशा २१ विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी वरसई आश्रम शाळेचे शिक्षक बनसोडे, कोकरे, ठोबरे, खरात, बागर, वणवे, सूत्रसंचालक अक्षय पाटील विद्यार्थी व ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाचवड येथे झालेल्या विज्ञान स्पर्धेत रयत स्कूल, शिरवळच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२३, खंडाळा (सातारा) :** रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागामार्फत पाचवड येथे महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पाचवड येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शन व विविध स्पर्धांमध्ये रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली. या विज्ञान स्पर्धेमध्ये प्रकल्प निर्मिती स्पर्धेत स्मित कुलभूषण चोबारकर याने तृतीय क्रमांक, निबंध लेखन स्पर्धेत श्रीषा राहुल पवार हिने प्रथम क्रमांक, प्रश्नमंजुषा स्पर्धेत आराध्या योगेश दरेकर व मृगनयनी राहुल सोनमाळी यांनी प्रथम क्रमांक, तर विज्ञान खेळणी स्पर्धेत सोहम महेंद्र शेडगे व वेदांत अमोल घाडगे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख यांच्याकडूनही विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच या स्पर्धेच्या यशस्वी सहभागासाठी पर्यवेक्षिका वासंती घाडगे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. या यशामध्ये शाळेच्या विज्ञान शिक्षिका राऊत यांचे मोलाचे मार्गदर्शन व परिश्रम लाभले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची गोडी निर्माण होऊन त्यांनी उत्तम सादरीकरण केले, असे मत व्यक्त करण्यात आले. या घवघवीत यशामुळे रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळचे नाव विज्ञान क्षेत्रात उज्वल झाले असून सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.

# थोडक्यात

## शब्दात विश्वास आणि कृतीत विकास म्हणूनच जनशक्ती आमच्यासोबत - आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते ढोकी येथील गावठाण परिसरातील रस्ता काँक्रीटीकरणासह विविध विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या विकासकामांमुळे ढोकी व परिसरातील नागरिकांना दळणवळणासह मूलभूत सुविधांचा मोठा लाभ होणार आहे. यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले की, आमच्या शब्दात विश्वास आणि कृतीत विकास आहे, म्हणूनच जनशक्ती आमच्यासोबत ठामपणे उभी आहे. गेल्या वर्षभरात तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांच्या मागणीनुसार अनेक विकासकामे मार्गी लागली असून, त्याचा वेग सर्वसामान्य नागरिक अनुभवत आहेत, असे त्यांनी नमूद केले. केवळ तात्कालिक कामांपुरते न थांबता, भविष्याचा वेध घेऊन मतदारसंघातील नागरिकांच्या उज्वल भवितव्यासाठी मोठे व दूरगामी प्रकल्पही कार्यान्वित होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच संपूर्ण मंत्रीमंडळाचे भक्कम सहकार्य लाभत असल्याने मतदारसंघातील विकासकामांना गती मिळत असल्याचे आमदार दाते यांनी यावेळी स्पष्ट केले. नागरिकांनी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रतिनिधींच्या पाठीशी उभे राहिल्यास विकासाचा वेग निश्चितच वाढतो,असा विश्वास व्यक्त करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून गट-तट बाजूला ठेवून कामाच्या माणसांना निवडून दिले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी मार्केट कमिटी सदस्य बाबासाहेब नऱ्हे, शंकर धरम, बबई नऱ्हे, बाबासाहेब धरम, शिवाजी धरम, पाटीलबा मोरे, बापू मोरे, डॉ.गंगाधर धरम, रामदास चितळकर, भाऊसाहेब मोरे, ठकाजी नऱ्हे, दिनकर नऱ्हे, देवराम नऱ्हे, जानमहंमद शेख, रावसाहेब नऱ्हे, अशोक नऱ्हे, म्हपाजी धरम, प्रदीप गोसावी, बाळू नऱ्हे, अमोल गिरी, सलीम पठाण, चैतन्य धरम, भास्कर खटके, पोपटराव वाकचौरे, दुर्गाजी शिंदे आदींसह ढोकी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मायभूमी मध्ये गणेश जयंती मोठ्या उत्साहात

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** सुरुल, (मायभुमी) ता.पाटण येथे सालाबाद प्रमाणे माघ महिन्यातील शुद्ध चतुर्थीला विघ्नहर्ता गणरायाचा जन्मतिथि उत्सव साजरा होतो. यावर्षी गुरुवार, दि.२२ जानेवारी २०२६ च्या मुहूर्तावर सुरूल, ग्रामस्थ व प्रवीण मोटे, बाळासाहेब मोटे, मायभूमी परिसर यांच्या संयुक्त विद्यमानाने येथील श्री गणेश मंदिरात हा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात तसेच विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. सुरूल, मायभूमी परिसर येथील श्री गणेश मंदिरात श्री गणेश जयंतीच्या निमित्ताने विविध धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८ ते ९ या वेळेत महाभिषेक करण्यात आला. सकाळी ९ ते ११ होम हवन सोहळा संपन्न झाला. गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री गणेश जन्मकाळ सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी ६ ते ८ सुरूल सुश्राव्य भजन मंडळ यांनी भजन गायन केले. श्री गणेश भक्त जणांना मंत्रमुग्ध केले सायंकाळी ७ नंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. महाप्रसादाचा भाविकांनी मनसोक्त लाभ घेतला. श्री गणेशाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची मंदिरापासून ते मुख्य कमानी पर्यंत रांग लागली होती भाविकांनी दर्शन रांगेतूनच घेतले. श्री गणेश जयंतीचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरुल ग्रामस्थांनी व मायभूमी परिसरातील भाविकांनी परिश्रम घेतले. श्री गणेश मंदिरावरती आकर्षक वीज रोशनाई करण्यात आली होती. संपूर्ण मायभूमी परिसर भक्तिमय वातावरणात न्याहून निघाला होता.

## श्रीसाई सेवा मंडळ तर्फे गणेश जयंती निमित्त महाप्रसाद वितरीत




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** श्री साई सेवा मंडळ तर्फे खापरखेडा मुख्य मार्गावरील श्री साईकृपा सायकल बाजार येथे श्री गणेश जयंतीचे औचित्य साधून गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ ला सायंकाळी ६ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामुहीक रित्या विधिवत श्री गणेशाची पूजा अर्चना करून आरती करण्यात आली. तद्नंतर आलूभात व बुंदीच्या महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी शेकडोच्या संख्येन श्री गणेश भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वतीसाठी अशोक वंजाळ, रमेश राऊत, हरीश लोडेकर, करण वंजाळ, विनीत भड, सूरज राऊत, गोलू भगत, रोहित बोरीकर, प्रफुल राऊत, अक्षय मर्जिवे, साहिल गीऱ्हे, वैभव मोवाडे, आशिष विरेकर, दिनेश लोडेकर, सोहन जालंदर आदीचे विशेष सहकार्य लाभले.

## जळगांव येथून तिरुपतीसाठी विमान सेवा सुरु करा; केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांना निवेदन



**अक्षराज : पूनम पपरदेशी**

**दि.२३, सोयगांव (छ.संभाजीनगर) :** सोयगांव(प्रति.) उत्तर महाराष्ट्रातील जळगांव शहर ही एक मुख्य बाजारपेठ आहे. तसेच जळगांव जिल्ह्याला लागूनच असलेल्या धुळे, नंदुरबार, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगांव, सिल्लोड तालुके मध्य प्रदेश राज्यातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातून तिरुपती बालाजी येथे दर्शनास जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु जळगांव विमान तळावरून तिरुपती साठी विमान सेवा नाही त्यामुळे भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. या संदर्भात भाजप जिल्हा युवा मोर्चा चिटणीस अजय पाटील यांनी केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन जळगांव शहरातून तिरुपतीसाठी विमान सेवा सुरु करण्यात यावी. त्याबद्दल मागणीचे निवेदन दिले. या मागणी बद्दल लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.